क्र.साप्रवि/गट-८(रवका)/सा.आ./
११७(क)/म.भत्ता/नस्ती क्र.५६९/२५०४
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
प्लॉट क्र.१, तळमजला, धारावी रोड,
माटुंगा, मुंबई - ४०० ०१९.
दिनांक : १७-०९-२००३.

## सुधारपत्र क्रमांक ३१ दिनांक १७.०९.२००३
(सर्वसाधारण आदेश क्र.११७ (क) दिनांक ३१-३-१९८६ करिता)

विषय: म.रा.वि.मंडळाच्या कर्मचा-यांना दिनांक १-८-२००३ पासून महागाईभत्ता वाढ देण्याबाबत.

वाचा: १) स.सा.आ.क्र.११७(क)दिनांक ३१-३-८६
२) स.सा.आ.क्र.१५२(क)दिनांक १०-१-२००१ व स.सा.आ.क्र.१५३(क)दिनांक १०-१-२००१.
३) स.सा.आ.क्र.११७(क)दिनांक ३१-३-८६ चे सुधारपत्र क्र.२९ दिनांक ०२.०२.२००२ व सुधारपत्र क्र.३० दिनांक ०६.०६.२००२.

................................

महाराष्ट्र शासनाने निर्णय क्र. वित्त विभाग क्र.मभवा-११०२/प्र.क्र.२२/सेवा/९ दिनांक १४.८.२००३ अन्वये शासनाच्या सर्व कर्मचा-यांना दिनांक ०१.०८.२००३ पासून वेतनश्रेणीतील मूळ वेतनाच्या ४४.५० % ऐवजी ५५% या सुधारित दराने महागाई भत्ता मंजूर केला आहे. त्यास अनुसरुन म.रा.वि.मंडळाच्या कर्मचा-यांना ०१.०८.२००३ पासून वेतनश्रेणीतील मूळ वेतनाच्या ४४.५०% ऐवजी ५५% या दराने महागाई भत्ता वाढ देण्याबाबतचा प्रस्ताव मंडळाच्या विचाराधिन होता.

२. शासनाच्या धर्तीवर आता मंडळाने निर्णय क्र.१००३ दिनांक १६.०९.२००३ अन्वये मंडळ कर्मचा-यांना दिनांक ०१.०८.२००३ पासून वेतनश्रेणीमधील मूळ वेतनाच्या ५५% या दराने महागाई भत्ता देण्यास मंजूरी दिली आहे.

(कृ.मा.पहावे)

३. मंडळाने असेही निर्देश दिले आहेत की, महागाई भत्ता वाढीमुळे होणा-या खर्चाची भरपाई करण्यासाठी मंडळाच्या कर्मचा-यांनी अतिरिक्त महसूल वाढविण्यासाठी कार्यक्षमतेत सुधारणा करुन प्रयत्न करावेत.

४. महागाई भत्याची रक्कम प्रदान करण्या संबंधात विद्यमान तरतूदी व कार्यपध्दती आहे तशाच यापुढेही लागू रहातील.

५. सुधारित दरानुसार महागाई भत्त्याचे प्रदान मंडळाच्या सर्व कर्मचा-यांना सप्टेंबर २००३ च्या वेतनातून लागू करण्यात यावे. तसेच ऑगस्ट २००३ या महिन्याची निव्वळ देय थकबाकी दिनांक २०-१०-२००३ ते २२-१०-२००३ दरम्यान अदा करावी.

६. संबंधित अधिका-यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी महागाई भत्त्याची वाढीव रक्कम तसेच ऑगस्ट २००३ च्या फरकाची रक्कम प्रदान करण्यासाठी आवश्यक असलेल्या निधीची मागणी श्री.व्ही.आर.शिरुरकर, सह मुख्य लेखाधिकारी (अर्थोपाय विभाग), हॉंगकॉंग बॅंक बिल्डींग, ४ था माळा, मुंबई-४०० ०२३ यांचेकडे त्वरीत करावी.

(सु.य.पाटील)
संचालक (कर्मचारीवर्ग)

प्रत:-
प्रेषण यादीप्रमाणे कार्यकारी अभियंता, तत्सम व त्यावरील दर्जाच्या अधिका-यांपर्यन्त माहितीसाठी.